**Establishment of Organic Farming Research & Training Centre.**
**Dr. Balasaheb Sawant Konkan Krishi Vidyapeeth**
**Dapoli 415 712, Dist. Ratnagiri (M.S.)**
**Telefax : 02358-282387**

www.dbskkv.org
ofrtcdapoli@gmail.com
ofrtcdapoli@rediffmail.com

**सेंद्रीय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे**
**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ**
दापोली ४१५ ७१२, जि. रत्नागिरी (महाराष्ट्र)
टेलिफॅक्स : ०२३५८-२८२३८७

जा.क्र. कृमविद्या/कृविवि/सेंद्रीयशेती/२८५/२०१९ दिनांक ११/०६/२०१९

# जाहिरात

या विद्यापीठांतर्गत कार्यान्वित असलेल्या "सेंद्रीय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे" योजनेमध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात खाली दिलेल्या तपशिलाप्रमाणे पद भरण्यासाठी सोबत जोडलेल्या नमुन्यात शैक्षणिक प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह पात्र उमेदवारांकडून दिनांक **२४/०६/२०१९** पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या | एकत्रित वेतन प्रती महिना (रू.) | नेमणुकीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | कृषि सहाय्यक | ०१ | १८,०००/- | ११ महिने |

**पात्रता :-**

| अ.क्र. | पदाचे नांव | आवश्यक पात्रता |
|---|---|---|
| १. | कृषि सहाय्यक | कृषि/उद्यानविद्या/वनशास्त्र विषयातील पदवी उत्तीर्ण किंवा कृषि विद्यापीठातील कृषि पदविका उत्तीर्ण सदर पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य |

**नियम व अटी :**

१. वयाची मर्यादा :- अर्जदाराचे वय ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. (अनुसुचित जाती/जमातीच्या अर्जदारांना नियमानुसार वयाच्या मर्यादेमध्ये सवलत दिली जाईल).

२. अर्जदाराने सोबत दिलेल्या नमुन्यामध्ये माहिती भरून **प्रकल्प प्रमुख, सेंद्रीय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे,** कृषि विद्या विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली यांचे कार्यालयात दिनांक **२४/०६/२०१९** पुर्वी पोहोचतील अशाप्रकारे पाठविण्यात यावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

३. अर्जाच्या लखोटयावर कोणत्या पदासाठी अर्ज केला आहे याचा ठळक उल्लेख करावा.

४. गुणवत्तेच्या आधारे प्रथम पाच पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल तसेच मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

५. मुलाखतीला येताना अर्जाला जोडण्यात आलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती सोबत आणाव्या लागतील.

कृ. मा. प.

६. मुलाखतीला बोलविण्यात आलेल्या उमेदवारांना प्रवास तसेच दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

७. निवड झालेल्या उमेदवाराला रू. १००/- किमतीच्या बाँड पेपरवर नियुक्त केलेल्या कालावधीत नोकरी सोडून जाता येणार नाही असे लिहून दयावे लागेल.

८. निवड झालेल्या उमेदवाराला अकरा महिने किंवा प्रकल्पाच्या कालावधीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात येईल.

९. नियुक्त केलेल्या उमेदवाराच्या कामाचे प्रकल्प प्रमुख यांचे मार्फत मुल्यमापन करण्यात येईल. सदर उमेदवाराचे काम असमाधानकारक आढळल्यास करण्यात आलेली नियुक्ती दिलेल्या कालावधीच्या आधि समाप्त करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहतील.

१०. निवड झालेल्या उमेदवार डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली या कार्यालयात कायमस्वरूपी नोकरी मिळण्यासाठी कोणताही हक्क राहणार नाही.

११. उमेदवाराला नोकरी सोडावयाची असल्यास त्याने तसे एक महिना आधी लेखी कळविण्यात यावे. तसे न केल्यास त्याचा एक महिन्याचा पगार कापून घेण्यात येईल.

१२. निम्नस्वाक्षरीकार यांना प्राप्त अर्ज/सर्व अर्ज कोणतेही कारण न दाखविता नाकारण्याचे हक्क आहेत.

१३. उमेदवाराला देण्यात आलेली तात्पुरत्या स्वरूपातील नियुक्ती वेतन प्रकल्प संपल्यानंतर आपोआपच रद्द होतील.

**प्रकल्प प्रमुख,**
**सेंद्रीय शेती संशोधन**
**व प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे**

**प्रत माहिती व प्रसिध्दीसाठी.**

१. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
२. अधिक्षक, सामान्य शाखा, डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर.**

१. मा. संशोधन संचालक, डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
२. मा. कुलसचिव, डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

| पासपोर्ट आकाराचा फोटो येथे चिकटवण्यात यावा. |
|---|

# अर्जाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १. पदाचे नाव | :- | |
| २. प्रकल्पाचे नाव | :- | सेंद्रीय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे |
| ३. अर्जदाराचे नाव | :- | |
| ४. पत्ता अ) सद्याचा पत्ता<br>ब) कायमचा पत्ता | :- | |
| ५. जन्म तारीख | :- | |
| ६. दिनांक २४/६/२०१६ रोजी वय | :- | ......... वर्ष..............महिने........दिवस |
| ७. धर्म/जात | :- | |
| ८. दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक | :- | |
| ९. शैक्षणिक अर्हता | :- | |

| परीक्षा | बोर्ड/महाविद्यालयाचे /शाळेचे नाव | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|---|
| | | | |

१०. अनुभव

| पदाचे नाव | कालावधी | | कामाचे स्वरूप | कामाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |

११. इतर.

मी असे लिहून देतो/देते की, वर दिलेली सर्व माहिती बरोबर असून ती सत्य आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास उपरोक्त पदासाठी मी अपात्र होईन याची मला जाणिव आहे.

दिनांक :

ठिकाण : **स्वाक्षरी**

**टिप: अर्जासोबत जोडण्यात येणा-या सर्व प्रमाणपत्रांच्या छांयाकित प्रती सत्यप्रत केलेल्या असाव्यात.**
**जर प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती स्वयंसाक्षांकित केल्या असतील तर शासन निर्णय क्र. प्रसुधा/१६१४/३४५/ प्र.क्र.७१/१८-अ, दिनांक ०९.०३.२०१५ अन्वये विहित नमुन्यातील स्वयंसाक्षांकनाचे स्वयंघोषणापत्र सोबत सादर करणे आवश्यक आहे.**